यूजीसीच्या नवीन नियमांवरुन केंद्र सरकारला धक्का! सुप्रीम कोर्टाने दिला महत्वाचा निर्णय >>पान 2

पाच दिवसात वाड्या-वस्त्या विजेच्या दिव्यांनी उजळल्या; दादांची संवेदनशीलता अनब कार्यतत्परतेची नाशिक जिल्ह्याला प्रचिती >>पान 3

महाराष्ट्राच्या नेतृत्वाला अखेरचा निरोप : मेहकर-डोणगाव येथे सर्वपक्षीय श्रद्धांजली सभेत अश्रूंना वाट मोकळी >>पान 4

**सुविचार**

शिक्षणाचे तीन पैलू असतात- योग, उपयोग व सहयोग.- अज्ञात

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 170 ■ शुक्रवार, दि. 30 जानेवारी 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



बॉर्डर २च्या यशानंतर सनी देओलनं व्हिडिओ शेअर करुन मानले चाहत्यांचे आभार

आतील पान

# जनतेच्या ‘कामाचा माणूस’ अनंतात विलीन!

## अजित पवारांच्या दोन्ही मुलांनी दिला मुखाग्नी

दैनिक आपला विदर्भ

**बारामती/प्रतिनिधी : महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि बारातमीचे आमदार अजित पवार अनंतात विलीन झाले आहेत. बुधवारी सकाळी पावणे नऊ वाजता अजित पवार हे विमानाने बाराम तीमधील जाहीर प्रचार सभांसाठी पोहचत असताना त्यांच्या विमानाला भीषण अपघातात त्यांचा मृत्यू झाल्यानंतर आज बारामतीमध्ये त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अजित पवारांचे पुत्र जय पवार आणि पार्थ पवार या दोघांनीही वडिलांच्या पार्थिवाला मुखाग्नी दिला. यावेळी अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवार, काका आणि राष्ट्रवादीचे संस्थापक शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे, पुतण्या रोहित पवारांसोबतच संपूर्ण पवार कुटुंब उपस्थित होतं.**







अजित पवारांचं अंत्यदर्शन घेण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजपचे नवे राष्ट्रीय अध्यक्ष नितिन नबीन यांच्यासहीत राज्यातील अनेक नेते उपस्थित होते. 'अमर रहे अमर रहे अजित पवार अमर रहे', 'अजित पवार जिंदाबाद', 'एकच वादा, अजितदादा' अशा घोषणांमध्येच अजित पवारांच्या समर्थकांनी साश्रू नयनांनी त्यांना अखेरचा निरोप दिला. 'कामाचा माणूस' अशी जनमाणसामध्ये प्रतिमा असलेला, प्रशासनावर जबरदस्त पकड असलेला नेता महाराष्ट्राने गमावल्याची भावना व्यक्त करत प्रत्येकजण पाणावलेल्या डोळ्यांनी अजित पवारांना शेवटचं डोळे भरुन पाहत होता.

**आधी निवासस्थानी नेलं पार्थिव...**

१ लाखांची क्षमता असलेलं बारामतीमधील विद्या प्रतिष्ठानचं मैदान समर्थकांनी खचखाच भरलं होतं. काल रात्रीपासूनच अजित पवारांचं अंत्यदर्शन घेण्यासाठी समर्थकांनी मोठी गर्दी केली होती. सकाळी अजित पवारांचं पार्थिव त्यांचं मूळ गाव असलेल्या काटेवाडीमधील 'पवार फार्म' या निवासस्थानी नेण्यात आलं होतं. तिथे पवार कुटुंबातील सदस्यांनी अजित पवारांच्या पार्थिवाचं अत्यंदर्शन घेतल्यानंतर काटेवाडीमधून अजित पवारांचं पार्थिव विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर नेण्यात आलं. इथे अंत्यंविधीसाठी विशेष चौथरा बांधण्यात आला होता. याच ठिकाणी अजित पवारांना मुखाग्नी देण्यात आला. विमानतळापासून दोन किलोमीटर अंतरावर ५०० मीटरवरुन विमान कोसळून विमानाला भीषण आग लागली. या अपघातामध्ये अजित पवारांसहीत विमानातील क्रू मेंबर आणि अजित पवारांचे सहकारी अशा एकूण सहा जणांचा मृत्यू झाला. अजित पवारांच्या आकस्मिक निधनाने संपूर्ण महाराष्ट्राला मोठा धक्का बसला असून देशभरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.

**गर्दीच गर्दी**

अजित पवारांना पोलीस दलाने काटेवाडीतील घरासमोरच अखेरची सलामी दिली. अजित पवारांना अखेरचं पाहण्यासाठी रस्त्यांच्या दुतर्फा नागरिकांनी गर्दी केली होती. अनेक ठिकाणी अजित पवारांचं पार्थिव घेऊन जाणाऱ्या रुग्णावाहिकेवर स्थानिकांनी फुलांचा वर्षाव केला. अनेक महिलांना अश्रू अनावर झाले होते. बाराम तीने आपला सर्वात लाडका लेक गमावल्याची भावना स्थानिकांनी व्यक्त केली.

**अनेक नेत्यांची हजेरी**

अनेक आजी-माजी मंत्री अजित पवारांचं अंत्यदर्शन घेण्यासाठी बारामतीत हजर होते. सुशील कुमार शिंदे, प्रणिती शिंदे, खासदार शाहू महाराज, विश्वजीत कदम, अशोक चव्हाण, शशिकांत शिंदे, मंत्री शिवेंद्रसिंहराजे, जयंत पाटील, हर्षवर्धन पाटीलही अजित पवारांच्या अंत्यसंस्कारासाठी उपस्थित होते. मंगलप्रभात लोढा, प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे, मंत्री चंद्रकांत पाटील, छगन भुजबळ अजित पवारांच्या अंत्यसंस्कारासाठी हजर होते. राज ठाकरे, शर्मिला ठाकरे, अमित ठाकरे देखील अंत्यसंस्कारासाठी उपस्थित होते. याचबरोबर विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर अजित पवारांच्या अंत्यसंस्कारासाठी पोहोचलेले नवाब मलिक, अमोल मिटकरी, रुपाली चाकणकर ढसाढसा रडले. अनेक नेत्यांनी अश्रू अनावर झाल्याचं दिसून आलं.







## बॉडीगार्ड विदीप जाधव यांच्यावर साताऱ्यात अंत्यसंस्कार

**सातारा/प्रतिनिधी :** बुधवारी बारामतीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाला भीषण अपघात झाला. या अपघातात अजित पवारांसह एकूण पाच जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये अजित पवारांची सावली म्हणून वावरणारे त्यांचे सुरक्षारक्षक विदीप जाधव यांचाही समावेश होता. काल अपघातानंतर रात्री उशिरा त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. फलटण तालुक्यातील तरडगाव या त्यांच्या मूळगावी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

विदीप जाधव हे मुंबई पोलीस दलात कार्यरत होते. ते मागील काही वर्षांपासून अजित पवार यांचे पीएसओ म्हणून काम करत होते. अजित पवार कुठेही गेले तरी त्यांच्या जीवाची रक्षा करण्यासाठी विदीप जाधव सावलीसारखे त्यांच्यासोबत असायचे. त्यामुळे त्यांना अजित पवारांची सावली देखील म्हटलं जायचं.

## राज्यपाल आचार्य देवव्रत व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन

**बारामती/प्रतिनिधी :** राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी केंद्रीय नागरी विमानवाहतूक मंत्री राममोहन नायडू किंजारापू, राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, शिक्षणमंत्री दादाजी भुसे, महिला व बाल विकास मंत्री कु. अदिती तटकरे, बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंह राजे भोसले, अजित पवार यांच्या पत्नी खासदार सुनेत्रा पवार यांच्यासह खासदार सुप्रिया सुळे, आमदार राहूल कुल, अ‍ॅग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टचे चेअरमन राजेंद्र पवार आदी उपस्थित होते.

## भाजपने अजितदादांवरील ७० हजार कोटींच्या घोटाळ्याचे आरोप मागे घ्यावेत, हीच खरी श्रद्धांजली ठरेल: संजय राऊत

**मुंबई/प्रतिनिधी** :राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बुधवारी बारामती येथे विमान अपघातामध्ये निधन झाले. अजित पवार यांच्या पार्थिवावर गुरुवारी बारामतीच्या विद्या प्रतिष्ठान येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी अजित पवार यांना शेवटचा निरोप द्यायला राज्यभरातून हजारोंचा जनसमुदाय बारामतीत जमला होता. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन, नितीन गडकरी, रामदास आठवले, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्यासह राज्य आणि देशातील बडे नेते अजित पवारांच्या अंत्यसंस्कारासाठी बारामतीच्या विद्या प्रतिष्ठान येथे उपस्थित होते. पार्थ पवार आणि जय पवार या दोन्ही मुलांनी अजित पवार यांच्या पार्थिवाला मुखाग्नी दिला. यानंतर काहीवेळातच ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी एक ट्विट केले आहे. या ट्विटमधून संजय राऊत यांनी अजित पवार यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करणाऱ्या भाजपला लक्ष्य केले आहे.अजित पवार यांच्या निधनानंतर आज भाजपने राज्यातील प्रमुख दैनिकांमध्ये अजितदादांनी श्रद्धांजली वाहणाऱ्या या जाहिराती दिल्या आहेत. हाच धागा पकडत संजय राऊत यांनी भाजपला लक्ष्य केले.

## दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसची युती होणार? प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांचं मोठं विधान, आता आम्हाला सत्य...

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** :राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं विमान दुर्घटनेत दुर्दैवी निधन झालं असून, यामुळे राज्याचा राजकारणात एकच खळबळ उडाली आहे. एकीकडे पवार कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला असताना, दुसरीकडे आगामी दिवसांमध्ये हेच पवार कुटुंब महाराष्ट्रातील राजकारणाच्या केंद्रस्थानी असणार आहे. याचं कारण अजित पवारांच्या जाण्याने राष्ट्रवादी काँग्रेसचं नेतृत्व हरपलं असून, आता आगामी दिवसात पक्षासंदर्भातील निर्णय आणि रणनिती याकडे सर्वांचं लक्ष असेल. यातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येणार का? राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनीही यावर भाष्य करण्यास सुरुवात केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणावर भाष्य केलं आहे. ''आता सत्य बोलावंच लागेल. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र याव्यात अशी त्यांची प्रामाणिक इच्छा होती. नगरपंचायत आणि नगरपालिका निवडणुकीनंतर तशी प्राथमिक चर्चा झाली होती. महापालिकेनंतर लगेच चर्चा करु असं ठरलं होतं. जिल्हा परिषद, पंचायत समितीनंतर निर्णयाला बसू आणि एकत्र बसून ठरवू अशी मानसिकता अजित पवार आणि आमच्या काही लोकांची होती. पण ते स्वप्न राहिलं. कुटुंब आणि आपण एकत्र आलं पाहिजे आणि पुढील वाटचाल केली पाहिजे अशी त्यांची भूमिका होती. पण ते होऊ शकलं नाही,'' असं सूचक विधान त्यांनी केलं आहे. अजित पवार यांनीही एका जाहीर सभेत आम्ही एकत्र आल्यावर इतरांच्या पोटात का दुखतं? असा प्रश्न विचारला होता.

**आता पुढे काय होण्याची शक्यता?**

पुढील काही दिवसात खासदार सुनेत्रा पवार यांची हंगामी अध्यक्ष म्हणून निवड केली जाण्याची शक्यता आहे. पण सुनेत्रा पवार यांच्याकडे संघटनात्मक किंवा राजकीय अनुभव नसल्याने ती अडचण ठरु शकते. मुलगा पार्थ आणि जय पवार यांच्याकडेही नेतृत्व सोपवण्याइतका अनुभव नाही.

**दोन्ही राष्ट्रवादी विलीन होणार?**

दोन्ही राष्ट्रवादी विलीन होण्यासंदर्भात दोन्ही शक्यता नाकारता येऊ शकत नाही. भाजपासोबत सत्तेत सहभागी होण्यासाठी अनेकांनी अजित पवारांसोबत जाण्याचा पर्याय निवडला होता.

शरद पवार जर भाजपासोबत युतीसाठी



तयार असतील तरच हे सर्व त्यांना साथ देतील अशी शक्यता आहे. अन्यथा ते शरद पवारांचं नेतृत्व स्विकारणार नाहीत. अनेक नेते, आमदारांची शरद पवारांसोबत जाऊन विरोधी पक्षात बसावं अशी इच्छा नाही अशी सूत्रांची माहिती आहे.

**२०२३ मध्ये अजित पवारांचं बंड**

१९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाल्यापासून अजित पवार त्यांच्यासोबत होते. शरद पवारांचे उत्तराधिकारी कोण असणार हा प्रश्न समोर आल्यानंतर अजित पवार आणि सुप्रिया सुळे ही दोन्ही नावं घेतली जात होती. अजित पवार आणि अन्य नेत्यांनी शरद पवारांना भाजपासोबत जाण्याचा प्रस्ताव दिला होता. पण तो फेटाळून लावल्यानंतर पक्षांतर्गत वाद उफाळला. सुप्रिया सुळेंकडे राज्याची जबाबदारी देण्यात आल्यानंतर अजित पवार अधिक संतप्त झाले आणि काकांविरोधात बंड केले. अजित पवारांनी २०२३ मध्ये वेगळी चूल मांडली.

## ऊर्जा क्षेत्रातून आत्मनिर्भरतेकडे...

भारतीय ऊर्जा क्षेत्रात ५०० अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीची संधी हे देशाच्या आर्थिक, औद्योगिक आणि राष्ट्रीय सुरक्षिततेच्या दिशेने टाकलेले ठोस पाऊल आहे. ऊर्जा धोरणांमधील बदल भारताला आत्मनिर्भरतेकडे नेत असून, ही गुंतवणूक त्याचेच प्रतीक. भारतीय ऊर्जा क्षेत्र आज एका निर्णायक वळणावर उभे आहे. गेल्या काही दशकांत ऊर्जा हा विषय केवळ वीज, पेट्रोल किंवा गॅसपुरता मर्यादित राहिला नव्हता; तो देशाच्या आर्थिक गतीशी, राष्ट्रीय सुरक्षेशी आणि सामान्य माणसाच्या जीवनमानाशी थेट जोडला गेला आहे. अशा वेळी भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या आणि वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेसाठी ऊर्जा ही गरज नसून, धोरणात्मक शस्त्र ठरते. याच पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय ऊर्जा क्षेत्रात ५०० अब्ज डॉलर्सपर्यंत गुंतवणुकीची संधी असल्याचे केलेले विधान केवळ उत्स्फूर्त घोषणेसारखे नाही, तर भारताच्या दीर्घकालीन ऊर्जा धोरणाचा सारांश आहे. आज जगातील अनेक देश ऊर्जा-संकटाशी झुंज देत आहेत. कुठे तेलाच्या किमती वाढत आहेत, कुठे वायुपुरवठ्यावर राजकीय तणावाचा परिणाम होत आहे, तर कुठे हवामानबदलामुळे पारंपरिक ऊर्जास्त्रोतांवर मर्यादा येत आहेत. अशा परिस्थितीत भारताने मागील दहा वर्षांत ऊर्जा क्षेत्रात जी पावले उचलली आहेत, ती केवळ तात्पुरती समस्या सोडवणारी नसून, भविष्यातील संकटांपासून देशाला सुरक्षित ठेवणारी आहेत. ऊर्जा स्वावलंबन हा केवळ आर्थिक प्रश्न नाही; तो राष्ट्रीय स्वाभिमानाशी आणि सार्वभौमत्वाशी जोडलेला आहे, हे या धोरणामागील मूळ सूत्र आहे. भारत मोठ्या प्रमाणावर आयातीत इंधनावर अवलंबून होता. विदेशी गंगाजळीचा मोठा हिस्सा तेल आणि वायू आयातीसाठी खर्च होत असे. याचा थेट परिणाम अर्थसंकल्पावर, चलन स्थैर्यावर आणि महागाईवर होत असे. या पार्श्वभूमीवर ऊर्जा क्षेत्रात देशांतर्गत उत्पादन वाढवणे, शोधकार्याला चालना देणे आणि नवीन तंत्रज्ञान स्वीकारणे हे अपरिहार्य होते. गेल्या काही वर्षांत या दिशेने जे प्रयत्न झाले, त्यातूनच आज ५०० अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीची शक्यता वास्तववादी वाटू लागली आहे. म्हणूनच, ऊर्जा क्षेत्रातील ही गुंतवणूक संधी एका क्षेत्रापुरती मर्यादित नाही. तेल आणि वायूचा शोध, त्यावर प्रक्रिया, वाहतूक-व्यवस्था, वितरण जाळे, तसेच सौर, पवन, जल आणि जैवइंधन यांसारख्या स्वच्छ ऊर्जास्रोतांचा विस्तार या सर्वांचा त्यात समावेश आहे. विशेष म्हणजे, या सर्व क्षेत्रांत गुंतवणूक करण्यासाठी आवश्यक असलेली धोरणात्मक स्पष्टता आणि स्थिरता आज भारतात उपलब्ध आहे. गुंतवणूकदारांसाठी सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे, दीर्घकालीन धोरणांची विश्वासार्हता आणि ती ऊर्जा क्षेत्रात आज स्पष्टपणे दिसून येते. ऊर्जा धोरणातील एक महत्त्वाचा बदल म्हणजे, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक ऊर्जेवर दिला जाणारा भर. वाढती औद्योगिक गरज आणि पर्यावरणीय जबाबदारी यांचा समतोल साधणे, हे आज प्रत्येक देशासमोरील आव्हान आहे. भारताने या दोन्ही गोष्टी एकत्र नेण्याचा प्रयत्न केला आहे. सौर आणि पवनऊर्जेच्या क्षेत्रात भारताने जी झेप घेतली आहे, ती देशांतर्गत गरज भागवण्यासाठी नव्हे, तर जागतिक स्तरावर नेतृत्व मिळवण्यासाठी आहे. मोठ्या प्रमाणावर सौरऊर्जा प्रकल्प, ग्रामीण भागात स्वच्छ ऊर्जा पोहोचवण्याचे प्रयत्न आणि ऊर्जा-साठवण क्षमतेवर दिला जाणारा भर हे याचेच निदर्शक आहेत. ऊर्जा धोरणाचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे, नैसर्गिक वायूचा वाढता वापर. प्रदूषण कमी करण्यासाठी आणि औद्योगिक, तसेच घरगुती गरजा भागवण्यासाठी नैसर्गिक वायू हा तुलनेने स्वच्छ पर्याय मानला जातो. शहरांमध्ये वायू वितरण-व्यवस्था विस्तारण्यावर दिला जाणारा भर, उद्योगांसाठी सुलभ वायुपुरवठा आणि वाहतुकीत स्वच्छ इंधनाचा वापर वाढवण्याचे प्रयत्न हे याच धोरणाचा भाग आहेत. यामुळे एकीकडे पर्यावरणीय संतुलन राखले जात आहे, तर दुसरीकडे औद्योगिक उत्पादनाचा वेगही वाढत आहे. ऊर्जा क्षेत्रातील गुंतवणूक हा भांडवलाचा प्रश्न नाही; तर तो रोजगारनिर्मितीशी थेट जोडलेला आहे. तेलशुद्धीकरण प्रकल्प, वायू प्रक्रिया केंद्रे, ऊर्जा वितरण जाळे, सौर आणि पवन प्रकल्प, तसेच संशोधन आणि तंत्रज्ञान विकास या सर्व क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर कुशल आणि अर्धकुशल मनुष्यबळाची गरज असते. त्यामुळे ऊर्जा क्षेत्रातील विस्तार म्हणजे, तरुणांसाठी रोजगाराच्या नव्या संधी. विशेषतः ग्रामीण आणि अर्धशहरी भागात ऊर्जा प्रकल्पांमुळे स्थानिक रोजगार निर्माण होतो, ज्याचा सामाजिक आणि आर्थिक परिणाम दूरगामी असतो. ऊर्जा स्वावलंबनाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे राष्ट्रीय सुरक्षा. विदेशी इंधनावर अवलंबित्व जितके जास्त, तितकी देशाची असुरक्षितता वाढते. जागतिक राजकारणातील बदल, युद्धसदृश परिस्थिती किंवा व्यापार तणाव यांचा थेट परिणाम ऊर्जापुरवठ्यावर होऊ शकतो. भारताने ऊर्जास्त्रोतांचे विविधीकरण करून आणि देशांतर्गत उत्पादन वाढवून या जोखमी कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. स्वच्छ ऊर्जा, नैसर्गिक वायू आणि जैव इंधन यांचा वाढता वापर ही त्याचीच उदाहरणे आहेत. या सगळ्या प्रयत्नांचा एकत्रित परिणाम म्हणजे भारताची जागतिक ऊर्जा नकाशावर बदलती भूमिका होय. आज भारत निव्वळ ऊर्जा आयात करणारा देश राहिलेला नाही; तर तो ऊर्जा तंत्रज्ञान, प्रक्रिया आणि व्यवस्थापनाच्या क्षेत्रात एक विश्वासार्ह भागीदार म्हणून पुढे येत आहे. विदेशी गुंतवणूकदारांसाठी भारत हे पसंतीचे ठिकाण ठरत आहे. कारण, येथे जगातील सर्वात मोठी बाजारपेठ, स्थिर धोरणे आणि दीर्घकालीन दृष्टिकोन आहे. ५०० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक संधी ही याच बदलत्या वास्तवाची साक्ष आहे. ऊर्जा क्षेत्रातील ही वाटचाल आर्थिक आकडेवारीत मोजता येणार नाही. तिचा परिणाम सामान्य माणसाच्या जीवनावर, उद्योगांच्या कार्यक्षमतेवर आणि देशाच्या जागतिक प्रतिमेवर होणार आहे. स्वस्तात उपलब्ध होणारी स्वच्छ ऊर्जा म्हणजे शेतीपासून उद्योगांपर्यंत सर्व क्षेत्रांना चालना मिळणेच होय. वीज, इंधन आणि वायू सहज उपलब्ध झाल्यास उत्पादन खर्च कमी होतो, स्पर्धात्मकता वाढते आणि देशाची आर्थिक गती अधिक मजबूत होते.

# यूजीसीच्या नवीन नियमांवरुन केंद्र सरकारला धक्का! सुप्रीम कोर्टाने दिला महत्वाचा निर्णय

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** सर्वोच्च न्यायालयाने नव्या यूजीसी इक्विटी नियमांना अंतरिम स्थगिती देत केंद्र सरकारला महत्त्वाचा धक्का दिला आहे. न्यायालयाच्या मते, या नियमांची भाषा प्रथमदर्शनी अस्पष्ट असून त्याचा गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नियमांतील तरतुदी अधिक स्पष्ट आणि नेमक्या करण्यासाठी त्यांचे पुनर्लेखन आवश्यक असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे. जोपर्यंत नव्या नियमांमध्ये सुधारणा केली जात नाही, तोपर्यंत २०१२ मधील जुने यूजीसी नियमच लागू राहतील, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी १९ मार्च रोजी होणार आहे.

निर्णय काय?

देशभरात नव्या यूजीसी इक्विटी नियमांविरोधात तीव्र प्रतिक्रिया उमटत असताना, गुरुवारी भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर या नियमांवर दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी झाली. या याचिकेत नव्या नियमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये भेदभाव निर्माण होण्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. सुनावणीअंती न्यायालयाने 'यूजीसी प्रमोशन ऑफ इक्विटी नियम २०२६' यांना तात्पुरती स्थगिती देण्याचा निर्णय जाहीर केला.

सरन्यायाधीश काय म्हणाले?

सुनावणीदरम्यान सरन्यायाधीशांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, नियमांची मांडणी पुरेशी स्पष्ट नाही. अशा परिस्थितीत त्याचा चुकीचा अर्थ लावला जाऊ शकतो किंवा गैरवापरही होऊ शकतो. त्यामुळे तज्ज्ञांकडून या नियमांच्या भाषेची तपासणी करून त्यात आवश्यक सुधारणा करणे गरजेचे आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.



यावेळी ज्येष्ठ वकील इंदिरा जयसिंग यांनी न्यायालयाचे लक्ष वेधताना सांगितले की, २०१९ पासून २०१२ च्या नियमांविरोधात एक याचिका प्रलंबित आहे. आता त्या नियमांच्या जागी २०२६ चे नवे नियम आणण्यात आले आहेत. मात्र सरन्यायाधीशांनी यावर प्रतिक्रिया देताना सांगितले की, न्यायालय काळाच्या ओघात मागे जाऊन प्रत्येक बाबीचा पुनर्विचार करू शकत नाही. सरन्यायाधीशांनी केंद्र सरकारचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सॉलिसिटर जनरल यांना सूचना करताना सांगितले की, समाजात कोणत्याही प्रकारचा भेदभाव न होता सर्वांचा समन्वयाने विकास व्हावा यासाठी प्रतिष्ठित आणि तज्ज्ञ व्यक्तींची समिती स्थापन करण्याचा विचार करण्यात यावा. या समितीमार्फत नियमांची सखोल छाननी होणे आवश्यक आहे, असेही त्यांनी नमूद केले.

न्यायमूर्ती बागची यांनीही यावेळी आपले मत मांडताना सांगितले की, संविधानातील कलम १५(४) राज्यांना अनुसूचित जाती आणि जमातींसाठी विशेष तरतुदी करण्याचा अधिकार देते. मात्र पुरोगामी उद्देशाने केलेल्या कायद्याचा परिणाम प्रतिगामी स्वरूपाचा का व्हावा, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. शिक्षण व्यवस्थेत सामाजिक विभाजन निर्माण होणार नाही, याची काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

याचिकाकर्त्यांच्या वतीने बाजू मांडताना अधिवक्ता विष्णू शंकर जैन यांनी नियमांच्या कलम ३(सी) ला आव्हान दिले. या कलमामुळे जातीआधारित भेदभावाला प्रोत्साहन मिळत असल्याचा आरोप त्यांनी केला. त्यांच्या मते, ही तरतूद संविधानातील कलम १४ आणि १९ च्या विरोधात आहे. शिक्षण क्षेत्रात अशा प्रकारचा भेदभाव निर्माण झाल्यास सामाजिक दरी अधिक रुंदावण्याचा धोका असल्याचे त्यांनी सांगितले.

सरन्यायाधीशांनी यावर प्रतिक्रिया देताना स्पष्ट केले की, न्यायालय समानतेच्या मूलभूत अधिकाराच्या चौकटीतून या नियमांचा विचार करत आहे. हे नियम घटनात्मक कसोटीवर टिकतात की नाही, यावर सविस्तर युक्तिवाद होणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले. आता १९ मार्च रोजी होणाऱ्या पुढील सुनावणीकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

# अजित पवारांचा उत्तराधिकारी कोण?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या पार्थिवावर बारामतीमधील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अजित पवारांना त्यांची दोन्ही मुलं पार्थ आणि जय पवारांनी मुखाग्नी दिला. अजित पवारांच्या निधनानंतर पक्षाचं नेतृत्व कोण करणार? हा प्रश्न दबक्या आवाजात चर्चेत असतानाच आता अजित पवारांचा उत्ताराधिकारी म्हणून एक नाव पुढे येत असल्याचं अजित पवारांच्या पक्षाच्या नेत्याने म्हटलं आहे. अजित पवारांच्या अंत्यसंस्कारानंतर विद्या प्रतिष्ठानच्या मैदानातून बाहेर पडतानाच पक्षाचं नेतृत्व कोणाकडे द्यावं याबद्दल या नेत्याने भाष्य केलं आहे. बारामती विमानतळापासून दोन किलोमीटर अंतरावर ५०० मीटर उंचीवरुन अजित पवारांचं विमान कोसळून भीषण आग लागली. या अपघातामध्ये अजित पवारांसहीत विमानातील क्रू मेंबर आणि अजित पवारांचे सहकारी अशा एकूण सहा जणांचा मृत्यू झाला. अजित पवारांच्या आकस्मिक निधनाने संपूर्ण महाराष्ट्राला मोठा धक्का बसला आहे. आज लाखो लोकांच्या उपस्थितीत बारामतीमध्ये भावपूर्ण वातावरणात शेवटचा निरोप देण्यात आला. केंद्रीय गृहमंत्र्यांपासून मुख्यमंत्री आणि राज्यातील नेत्यांपासून ते लाखो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत अजित पवारांच्या पार्थिवाला मुखाग्नी देण्यात आला. अजित पवारांच्या निधनाची बातमी येताच सोशल मीडियापासून ते अगदी गप्पांमध्येही अजित पवारांनंतर पक्षाचं भवितव्य काय असेल? दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार का? यासारख्या प्रश्नांची राजकीय वतुर्ळात चर्चा होताना दिसतेय.

अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते नरहरी झीरवाळ यांनी पक्षाच्या सर्वोच्च नेत्याला निरोप दिल्यानंतर मैदानातून बाहेर पडताना उत्तराधिकाऱ्याबद्दल विधान केलं आहे. ''अजित पवारांचा उत्तराधिकारी सुनेत्रा वहिनीच असाव्यात,'' असं झीरवाळ यांनी म्हटलं आहे.

''राष्ट्रवादीची धुरा आता सुनेत्रा अजित पवार या सांभाळतील ही सर्वांचीच भावना आहे,'' असं नरहरी झीरवाळ म्हणाले आहेत. ''आता तुतारी, घड्याळ वेगळं नाही, दोन्ही एकच,'' असल्याचंही झीरवाळ म्हणालेत. ''आधीच दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आलेल्याच आहेत आता इथुन पुढे एकत्रच असणार यात शंका नाही,'' असंही झीरवाळ यांनी नमूद केलं आहे.

''सगळे बारामतीकर म्हणतीलच म्हणतील पण महाराष्ट्रातून सगळेजण म्हणतात की वहिनींना आता सत्तेत आणलं पाहिजे. सर्वसामान्य जनतेकडून होतेय विनंती तशी आमची विनंती आहे. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र झालेली आहे. नगरपरिषदेच्या निवडणुकीलाच एकत्र आले होते. काही ठिकाणी टोकाचा विरोध झाला होता पण आता एकत्र येण्याशिवाय पर्याय नाही,'' असंही नरहरी झिरवळ म्हणाले आहेत.

## बॉर्डर २च्या यशानंतर सनी देओलनं व्हिडिओ शेअर करुन मानले चाहत्यांचे आभार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूड अभिनेता सनी देओलच्या बॉर्डर २नं २९ जानेवारी रोजी बॉक्स ऑफिसवर प्रदर्शित होऊन एक आठवडा पूर्ण केला आहे. २३ जानेवारी रोजी थिएटरमध्ये दाखल झालेला या चित्रपटानं पहिल्या दिवशी बॉक्स ऑफिसवर जोरदार कमाई केली. पहिल्या दिवशीच चित्रपट हिट ठरला आहे. सकारात्मक प्रतिसादामुळं, चित्रपट फक्त सहा दिवसांत २५० कोटींच्या जवळ पोहोचला आहे. चित्रपटाला इतके प्रेम मिळत असल्याचं पाहून, सनी देओलनं प्रेक्षकांचे आभार मानले आहे. त्यानं गुरुवारी,त्याच्या इंस्टाग्रामवर एक व्हिडिओ पोस्ट केला आहे. या व्हिडिओमध्ये तो बर्फाच्छादित दऱ्यांमध्ये बसलेला दिसत आहे. व्हिडिओ शेअर करताना अभिनेत्यानं कॅप्शनमध्ये लिहिलं आहे, माझ्या, तुमच्या, आमच्या बॉर्डर २ला इतके प्रेम दिल्याबद्दल तुम्हा सर्वांना खूप खूप प्रेम.

# राज्याचे खंबीर नेतृत्व, मराठवाड्याचा आधारवड कोसळला!

प्रशासनावरील ज्यांची 'वचक', कामाचा 'उरक' पाहून अधिकारीही थक्क व्हायचे, असे संपूर्ण राज्याचे खंबीर नेतृत्व आज हरपले. अजित (दादा) पवार केवळ एका जिल्ह्याचे मर्यादित नेतृत्व नव्हते, तर ते राज्याचे उपमुख्यमंत्री, वित्त व नियोजन मंत्री आणि अल्पसंख्याक विकास मंत्री म्हणून राज्याचा गाडा समर्थपणे हाकत. ते राज्याचे नेते होतेच, पण त्याही पलीकडे जाऊन मराठवाडा विभागावर त्यांचा विशेष लोभ होता. दादा मूळचे पश्चिम महाराष्ट्राचे, पण धाराशिव त्यांचे सासर. त्यामुळे मराठवाड्याचे जावई म्हणून त्यांचा या भागावर जीव होताच, पण बीड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून त्यांनी जिल्ह्याला पितृवत प्रेम दिले.

**तखत श्री हजूर अबचलनगर साहिब जी गुरुद्वारातील ती अखेरची भेट**

अवघ्या दोन दिवसांपूर्वी, २५ जानेवारीला दादा मराठवाडा विभागाच्या दौऱ्यावर, नांदेडच्या पवित्र भूमीत होते. नांदेड येथील तखत सचखंड श्री हजूर अबचल नगर साहिब गुरुद्वारात ते नतमस्तक झाले. सुरुवातीला उपमुख्यमंत्री अजित पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील आणि आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी पवित्र गुरुद्वारात अत्यंत भक्तीभावाने दर्शन घेतले. कडा प्रसाद ग्रहण केला. यावेळी त्यांच्या चेहऱ्यावर समाधान होते. दर्शन झाल्यानंतर ते गुरुद्वारा परिसरात थांबले. तखत सचखंड श्री हजूर अबचल नगर साहिबजीं चे दर्शन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस घेऊन, बाहेर येईपर्यंत दादा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वाट पाहत होते. त्यानंतर मुख्यमंत्री,





उपमुख्यमंत्री व इतर सर्व मंत्री महोदय यांनी पवित्र गुरुद्वारातून एकत्रितपणे ऐतिहासिक हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शताब्दी समागम कार्यक्रमासाठी मोदी मैदानाकडे प्रस्थान केले. राज्याचे नेतृत्व म्हणून ज्येष्ठता आणि पदाचा मान राखण्याची त्यांची ही कृती सर्वांनाच भावली. गुरुद्वारा बोर्डाचे प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंघ जी यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि उपस्थित सर्व मान्यवरांचा यावेळी सन्मान केला.

**पालकमंत्र्यांचा धडाका आणि विश्वविक्रम**

एकीकडे नांदेडमध्ये ते अध्यात्मात रमले होते, तर दुसरीकडे बीडमध्ये त्यांनी विकासाचा विक्रम रचला होता. १ जानेवारी २०२६ ला वर्षाच्या पहिल्याच दिवशी त्यांनी बीडमध्ये एकाच वेळी १३६३ विकासकामांचे उद्घाटन आणि भूमिपूजन करून प्रशासनालाही अवाक केले होते.

केवळ इमारती नाहीत, तर निसर्गाशी नाते जोडत त्यांच्याच उपस्थितीत बीडमध्ये एकाच दिवशी ३० लाखांहून अधिक वृक्ष लागवड करण्यात आली. याची नोंद वर्ल्ड रेकॉर्ड ( ) मध्ये झाली. तरुणांवर त्यांचे विशेष प्रेम होते, म्हणूनच खेळाडूंसाठी क्रीडा विभागाचा २५ कोटींचा निधी मंजूर करून त्यांनी आंतरराष्ट्रीय दर्जाचे टर्फ ग्राउंड बीडकरांना दिले.

**सहकार आणि अर्थाची जोड**

प्रशासकीय शिस्तीचे भोक्ते असलेल्या दादांनी बीडमध्ये सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या विभागाच्या भव्य सहकार संकुलाचे भूमिपूजन केले. सर्व सहकारी कार्यालये एकाच छताखाली असावीत, हा त्यांचा आग्रह होता. राज्याचे वित्त व नियोजन मंत्री या नात्याने त्यांनी बीडच्या विकासाला कधीच निधी कमी पडू दिला नाही. १७ सप्टेंबर २०२५ ला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'अहिल्यानगर-बीड' रेल्वेचे उद्घाटन झाले. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी २ हजार कोटींपेक्षा जास्त निधी आणि ऐनवेळी दिलेले १५० कोटी रुपये, ही अर्थमंत्री म्हणून दादांनीच मंजूर केले होते.

**हृदयाची काळजी घेणारे दादा**

बीड जिल्हा रुग्णालयात कार्डियाक कॅथलॅब देऊन त्यांनी गोरगरिबांच्या हृदयाची सोय केली. दुर्दैवाने, बीडकरांच्या हृदयाची काळजी घेणाऱ्या पालकमंत्र्यांचे हृदय मात्र आज थांबले.


एकीकडे राज्याच्या अर्थव्यवस्थेचे सुकाणू समर्थपणे सांभाळणारे वित्त व नियोजन मंत्री आणि दुसरीकडे बीडच्या प्रत्येक प्रश्नावर बारकाईने लक्ष घालणारे पालकमंत्री... अशी दुहेरी भूमिका त्यांनी समर्थपणे पेलली. धाराशिवचे जावई आणि बीडचे पालक असलेल्या या विकासपुरुषाला भावपूर्ण श्रद्धांजली!

**– डॉ. श्याम टरके**
**सहायक संचालक (माहिती),**
**विभागीय माहिती कार्यालय, लातूर.**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## चोपडा तालुक्यात वादळी वाऱ्यासह गारपीट, शेतकऱ्यांचे मोठे पीक नुकसान





**दैनिक आपला विदर्भ**

**जळगाव/प्रतिनिधी :** चोपडा तालुक्यात परवा (२७ जाने.) वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस व गारपीट झाल्याने शेतकऱ्यांच्या शेतातील उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अचानक झालेल्या या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

गारपीट आणि वादळी वाऱ्यामुळे कांदा, केळी, कापूस तसेच इतर हंगामी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांची संपूर्ण पिके जमीनदोस्त झाली असून उत्पादन हातातून गेले आहे.

नुकसानग्रस्त शेती पिकांचे तात्काळ पंचनामे करून शासनाने शेतकऱ्यांना त्वरित आणि भरीव आर्थिक मदत द्यावी, अशी जोरदार मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

## फ्लाइट अटेंडंट पिंकी माळीच्या अंत्यदर्शनावेळी भावनिक क्षण

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** काल २८ जानेवारी हा दिवस महाराष्ट्रासाठी काळा ठरला आहे.काल बारामती येथे अजीत पवारांचा विमान अपघातात मृत्यु झाला.अजीत पवारांसह आणखी ४ जणांचाही या अपघातात मृत्यु झाला आहे.त्याच्यामधील एक फ्लाइट अटेंडंट मुंबई येथे राहणारी पिंकी माळी हिचाही या अपघातात दुर्दैवी मृत्यु झाला.एका क्षणात होत्याचं नव्हतं झाल्याने संबंधित कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

अजित पवार यांच्या पार्थिवावर बारामती येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. तर सुरक्षारक्षक विदीप जाधव यांच्या पार्थिवावर रात्री उशिरा तरडगाव येथे अंत्यसंस्कार झाले. दुसरीकडे, अपघातात मृत्युमुखी पडलेल्या फ्लाइट अटेंडंट पिंकी माळी हिचं पार्थिव प्रथम सासरी कळवा येथे आणण्यात आलं. त्यानंतर अंतिम दर्शनासाठी माहेरी वरळी येथे नेण्यात आले. पिंकी माळीच्या पार्थिवाला पाहताच तिच्या पती सोमकर यांना अश्रू अनावर झाले. पत्नीला अखेरचा निरोप देताना ते धाय मोकलून रडताना दिसले. अवघ्या तीन वर्षांपूर्वीच पिंकी आणि सोमकर यांनी संसाराची सुरुवात केली होती. आनंदी, उत्साही आणि मिळूनमिसळून राहणारं हे जोडपं सोसायटीत सर्वांच्याच परिचयाचं होतं. सण-उत्सव असो वा सामाजिक कार्यक्रम, दोघांचा नेहमीच उत्स्फूर्त सहभाग असायचा.

पिंकीच्या निधनाची बातमी समजताच माळी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. तिच्या वडिलांनाही अश्रू अनावर झाले होते. वरळी येथे अंत्यदर्शनासाठी नातेवाईक, मित्रपरिवार आणि नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. साश्रू नयनांनी पिंकी माळीला अखेरचा निरोप देण्यात येणार असून या दुर्घटनेने अनेक कुटुंबांच्या आयुष्यात कधीही न भरून येणारी पोकळी निर्माण झाली आहे.

# पाच दिवसात वाड्या-वस्त्या विजेच्या दिव्यांनी उजळल्या; दादांची संवेदनशीलता अनब कार्यतत्परतेची नाशिक जिल्ह्याला प्रचिती


**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बुधवारी (दि. २८) विमान दुर्घटनेत दुर्दैवी निधन झालंय. गुरुवारी अत्यंत शोकाकूल वातावरणात शासकीय इतमामात त्यांना अखेरचा निरोप देण्यात आला. अजित पवारांच्या पार्थिवाला त्यांचे चिरंजीव पार्थ आणि जय पवार यांनी मुखाग्नि दिला. विद्या प्रतिष्ठानच्या प्रांगणात समर्थकांनी अजित दादा अमर रहेचा गजर करत आपल्या लाडक्या दादाला भावपूर्ण निरोप दिला. तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कामाचा माणूस म्हणून अखेरच्या श्वासापर्यंत प्रतिमा ठेवली होती. ग्रामीण महाराष्ट्राशी त्यांची नाळ जोडली गेली होती. अजितदादांची संवेदनशीलता अनब कार्यतत्परतेची नाशिक जिल्ह्याला देखील प्रचिती आली आहे.

नाशिक जिल्ह्याच्या निफाड तालुक्यातील पिंपळस रामाचे परिसरातील वाडी-वस्त्यांवर २०१५ पर्यंत रात्री कधीच वीज नसत असे. पिंपळस येथील श्रीराज मत्सागर हा इयत्ता चौथीत शिकत असताना, रात्री रॉकेलच्या दिव्यावर आईसोबत अभ्यास करत असे. दिव्याच्या धुरामुळे त्याचे डोळे आणि तोंड काळे होत. याच परिस्थितीतून एक दिवस त्याने वडील सोमनाथ मत्सागर यांना 'पप्पा, आपल्याकडे रात्री कधीच लाईट येणार नाही का?' असे विचारले. मुलाचा हा प्रश्न मनाला चटका लावणारा होता.

सोमनाथ मत्सागर यांनी ठरवलं की, हा प्रश्न थेट राज्याचे तत्कालीन ऊर्जामंत्री अजितदादा पवार यांनाच विचारायचा. त्यांनी दादांच्या शासकीय निवासस्थान असलेल्या देवगिरी बंगल्यावर संपर्क साधण्यास सुरुवात केली. सलग तीन दिवसांच्या पाठपुराव्यानंतर अखेर तिसऱ्या दिवशी सायंकाळी अजितदादांशी त्यांचा संपर्क झाला. त्यांनी संपूर्ण परिस्थिती सांगत मुलाने विचारलेला तोच प्रश्न दादांसमोर मांडला.

दादांनी क्षणाचाही विलंब न लावता गावाचं नाव, पूर्ण पत्ता आणि जिल्ह्याची माहिती विचारली आणि फोन ठेवला. दुसऱ्याच दिवशी नाशिक विभागातील वीज मंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा सोमनाथ मत्सागर यांना फोन आला. दुपारी वीज मंडळाचे पाच ते सहा वरिष्ठ अधिकारी थेट पिंपळस रामाचे येथील कार्यालयात हजर झाले. त्यांनी परिस्थितीची पाहणी केली आणि तत्काळ हालचाली सुरू झाल्या. थेट बारामतीहून आवश्यक साहित्य मागवण्यात आले आणि उत्तर महाराष्ट्रातील सबस्टेशनमधून वाडी-वस्त्यांसाठी सिंगल फेज वीजपुरवठा करणारा ट्रान्सफॉर्मर बसवण्यात आला. अजितदादांना फोन केल्यानंतर अवघ्या चार ते पाच दिवसांत पिंपळस गावातील वाडी-वस्त्यांवर वीज पोहोचली.



## ..त्यांच्या निधनाने तो संघर्ष आज संपला, अजित पवारांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कारांनतर अंजली दमानियांच्या भावना



**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याचे उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री आणि दिलदार नेतृत्व म्हणून अवघ्या महाराष्ट्राला परिचित असणारे अजित पवार यांचं २८ जानेवारी २०२६ रोजी अपघाती निधन झालं. बारामती विमानतळावर त्यांचं विमान उतरताना अपघातग्रस्त झालं आणि अजित पवारांसह विमानातील सर्व ६ जणांचा मृत्यू झाला. अजित पवारांच्या अशा अकाली निधनामुळे समस्त महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक वतुर्ळाला मोठा धक्का बसला. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी अजित पवारांच्या निधनावर मनस्वी शोक व्यक्त केला होता. अजित पवार हयात असताना अंजली दमानिया यांनी त्यांच्याविरोधात मोठा संघर्ष उभा केला होता. पण आता त्यांच्या निधनानंतर तो संघर्ष संपल्याच्या भावना अंजली दमानिया यांनी व्यक्त केल्या आहेत.

बुधवारी २८ जानेवारी रोजी अजित पवार, त्यांचा सुरक्षा रक्षक, विमानातील एक क्रू सदस्य, पायलट व को-पायलट असे सर्वजण खासगी विमानाने मुंबईहून बारामतीच्या दिशेनं निघाले होते. बारामतीमध्ये जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या प्रचारासाठी अजित पवार तिकडे निघाले होते. बारामती विमानतळ परिसरात ८ वाजून ४० मिनिटांनी अजित पवारांचं विमान पोहोचलं. पण लँडिंगसाठी हवामान योग्य नसल्यामुळे वैमानिकाला धावपट्टीच दिसू शकली नाही. त्यामुळे लँडिंगचा पहिला प्रयत्न अयशस्वी ठरला. दुसऱ्यांदा पुन्हा लँडिंगसाठी प्रयत्न करण्यात आला. यावेळी धावपट्टी दिसत असल्याचं वैमानिकानं सांगितलं. पण धावपट्टीचा अंदाज चुकल्यामुळे अखेर विमान बाजूच्या मोकळ्या जागेत कोसळलं.

विमान कोसळताच विमानानं पेट घेतला. मोठा स्फोट झाला आणि विमानातील सर्व प्रवाशांचा जागीच मृत्यू झाल्याचं प्रशासनाकडून जाहीर करण्यात आलं आहे. यामध्ये अजित पवार यांच्यासह मुंबई पोलीस दलातील त्यांचे सुरक्षा रक्षक विदीप जाधव, वैमानिक कॅप्टन सुमीत कपूर, वैमानिक सांभवी पाठक व फ्लाईट अटेंडंट पिंकी माळी यांचा समावेश होता.

दरम्यान, सिंचन घोटाळ्याप्रमाणेच इतरही अनेक प्रकरणांमध्ये अजित पवार, पार्थ पवार किंवा पवार कुटुंबातील इतर काही सदस्य, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील काही नेतेमंडळी यांच्याविरोधात अंजली दमानियांनी मोहीम उघडली होती. अनेक पुराव्यांच्या आधारे अंजली दमानिया यांनी हा संघर्ष सुरू केला होता. प्रसंगी त्यांनी आक्रमक भूमिकादेखील घेतल्याचं पाहायला मिळालं होतं. पण आता अजित पवार यांच्या निधनानंतर हा संघर्ष संपल्याचं अंजली दमानियांनी पोस्टमध्ये म्हटलं आहे.

अजित पवार यांच्याविरुद्ध मी माझ्या आयुष्याचा मोठा काळ संघर्ष केला. तो वैचारिक आणि तत्त्वांचा लढा होता. काल त्यांच्या निधनाने तो संघर्ष आज संपला आहे. मतभेद तीव्र होते, पण मृत्यूसमोर सर्व वाद थांबतात. आज हा क्षण विचार करण्याचा आहे..लोकशाही, मूल्ये आणि संघर्ष यांचा. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो'', असं अंजली दमानियांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

दरम्यान, अजित पवार यांच्या पार्थिवावर आज बारामतीमधील विद्याप्रतिष्ठानच्या प्रांगणात अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी संपूर्ण पवार कुटुंबियांच्या दुःखात सहभागी होण्यासाठी केंद्रीय मंत्री, राज्यातील मंत्री, आमदार, नेतेमंडळी, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येनं बारामतीमधील जनता उपस्थित होती. 'अजित पवार अमर रहे'च्या घोषणांमध्ये आपल्या लाडक्या नेत्याला उपस्थितांनी शेवटचा निरोप दिला.

# चांदवड-निफाड रोडवर दोन दुचाकींचा भीषण अपघात; दोन तरुणांचा मृत्यू, तर तिघे गंभीर जखमी

**दैनिक आपला विदर्भ**








**नाशिक/प्रतिनिधी :** चांदवड-निफाड मार्गावर गणुर ते परसुल दरम्यान दोन मोटारसायकलची समोरासमोर जोरदार धडक होऊन भीषण अपघात झाला आहे. या दुर्घटनेत दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला असून, अन्य तीन तरुण गंभीर जखमी झाले आहेत. हा अपघात बुधवारी दुपारी एक वाजेच्या सुमारास घडला आहे. तर सर्व जखमींना रुग्णवाहिककीने घेऊन उपजिल्हा रुग्णालय चांदवड येथे आणण्यात आले. त्यानंतर तिथून जखमींना वेगवेगळ्या दवाखान्यात पाठवण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, दोन्ही दुचाकींची धडक इतकी भीषण होती की, दुचाकींचा चक्काचूर झाला आहे. अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी मदतीसाठी उपजिल्हा रुग्णालय येथे धाव घेतली.

या अपघातात प्रसाद विनायक शिंदे २२(रा. देवेरगांव) गणेश बंडु बर्डे (वय २३, रा. आसरखेडे) या दोन तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तसेच, या अपघातात तीन तरुण गंभीर जखमी झाले आहेत संकेत अरुण ठाकरे (वय २१, रा. गणुर)यास पिंपळगाव बसवंत येथे पुढील उपचारासाठी पाठविण्यात आले आहे.

अजिंक्य अण्णासाहेब शिंदे (वय २२, रा. देवरगांव) बाळु सखाराम गोधडे (वय २१, रा. गोईपुल चांदवड) हे जखमींना तात्काळ जवळच्या सुविधा हॉस्पिटल रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते.

ऐन तारुण्यात दोन मुलांचा मृत्यू झाल्याने देवेरगांव आणि आसरखेडे परिसरात शोककळा पसरली आहे. चांदवड पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.


## शब्दकोडे क्र. 72

आडवे शब्द

१. सज्जनांच्या नेहमीच विरूद्ध ४. चाणक्यनीती १०. लगत, शेजारी-शेजारी ११. समूह, संच १२. शेतावरील कर १३. इमारतीच्या पायात भरण्याचा राडारोडा १५. चुलता १६. घोड्याला आवर घालणारी वादी १७. उष्ण, कढत १९. नेमाने वारी करणारा २०. धनुष्य, नावाडी २१. साहित्यातील नऊ भावना २४. सरळ लांब वासा २५. यज्ञ २६. फार उष्ण व थंड नसलेले २८. अनाथांना आश्रय देणारी संस्था २९. निरर्थक बडबड ३१. छंद, आवाज ३२. 'अपना हाथ ----!' ३३. सध्याचे युग ३४. मोठी बहीण ३५. वर्ष, सन ३६. उजाड ३८. कान व डोळे यामधील भाग ४०. नुकतेच निधन झालेले प्रसिद्ध नाटककार- --- सरकार ४२. कौसल्यापुत्र ४३. जनावरांचा समूह ४४. हिंमत, धैर्य ४६. एक उबदार व सन्मानाचे वस्त्र ४७. दुप्पट (इंग्रजी) ४९. मध्यस्थ ५१. हिंदीत कीव, करूणा ५३. शर्विलक ५४. नोकर ५६. परग्रहावर जाणारे वाहन ५९. मेहरबानी ६०. बरोबर आलेली मंडळी ६३. जमीनजुमला ६६. श्रीमंत ६७. फोडामधील द्रव ६९. अवाढव्य, प्रचंड ७१. धैर्य ७२. मोठा समुद्र ७३. सूत काढण्याचे साधन ७४. वरपांगी, दिखाऊ

उभे शब्द

१. केशरचनेचा एक प्रकार, दुहेरी विण २. टक, दृष्टी ३. सनसनाटी ४. दुसऱ्याला कर्जबाजारी करणारा धंदा ५. मळलेला ६. टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास ७. अस्थिर, डळमळीत ८. अर्पिलेली वस्तू ९. आळशांनी लक्षात घ्यायचा पंडित नेहरूंचा संदेश १२. क्षुधावर्धक गरम पेय १४. विटीदांडूच्या खेळातील खड्डा २०. हिंदीत सावली २१. रोख २२. नवरदेव २३. पोरका २४. सक्तमजुरीची शिक्षा २७. बंदी २८. उपासमारीची स्थिती ३०. जम ३३. चिवचिवाट ३४. संगीतातील ठेका ३५. वर्षानुवर्षे ३७. सारखा ३८. कपडालत्ता ३९. गार, थंड ४१. संगीतातील एक राग ४४. अगम्य ४५. नूतन ४८. फणसाचा एक प्रकार ५०. कीव, करूणा ५२. रत्न ५५. गव्हाचे जाडसर पीठ ५७. लग्नातील नवरा मुलगा ५८. देशी दारू ६१. सैन्यातील एक हुद्दा ६२. सामान ६४. बातमीदार ६५. मुलायम ६८. षट, पाचनंतरचा आकडा ६९. नंतर ७०. पराभव, माळ ७१. प्रामाणिक



### शब्दकोडे क्र. 71 चे उत्तर

आडवे उत्तर

१.मोगल ३.सोमवती ६.मग ८.सदा ११.ताजमहाल १३.मजलदरमजल १६.लीन १८.यमुना २०.बरका २१.नाक २२.गरम २५.मतदार २६.बाट २७.करवट २८.कलमदान २९.ताई ३०.मना ३१.स्वीय ३४.वरवर ३७.करतल ४१.दामोदर ४४.तमा ४५.जळवात ४६.जर ४७.शूर ४८.वचनावचनी ५०.पाणी ५१.सराफ ५२.नार ५३.काळ ५४.शर ५६.पडदा ५७.खरवस ५८.समक्ष ६०.रविवासर ६३.कर्तन ६४.उदास ६६.सरण ६७.नद ६९.मदार ७०.वजीर ७१.वाणी ७२.रट्टा ७३.शरद ७४.भोकर ७५.पारोसा ७६.आरमार ७७.सापळा ८०.दुवा ८१.लक्ष ८२.मस्त ८३.पापणी

उभे उत्तर

१.मोगली २.लता ३.सोम ४.महा ५.वलय ६.मज ७.गलबत ८.सरकार ९.दाम १०.हलकट १२.जळमट १३.मना १४.दरदाम १५.जनाबाई १७.नगर १९.मुक्काम २३.रवरव २४.हकनाक २५.मनस्वी २७.करवत २९.ताठर ३२.यदा ३३.सटरफटर ३५.रमावर ३६.रचनाकार ३८.रजनीश ३९.तळ ४०.लवाद ४२.मोजणीदार ४३.दर ४७.शूरा ४९.वळवळ ५०.पाड ५१.सकवार ५२.नामकरण ५५.रसदार ५६.पक्ष ५७.खनन ५९.मस ६१.विसरभोळा ६२.सणवार ६४.उदाहरण ६५.अवदसा ६८.दरसाल ७३.शरम ७५.पावा ७८.पसा ७९.राणी

# महाराष्ट्राच्या नेतृत्वाला अखेरचा निरोप : मेहकर-डोणगाव येथे सर्वपक्षीय श्रद्धांजली सभेत अश्रूंना वाट मोकळी

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर / डोणगाव (प्रतिनिधी):** राज्यातील ज्येष्ठ व प्रभावी नेत्यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या निधनाबद्दल राज्य शासनाने तीन दिवसांचा शासकीय शोक जाहीर केला असून, शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

या पार्श्वभूमीवर मेहकर व डोणगाव येथे सर्वपक्षीय श्रद्धांजली सभांचे आयोजन करण्यात आले. मेहकर नगरपरिषदेच्या प्रांगणात तसेच डोणगाव येथे ग्रामपंचायत प्रशासनाच्या प्रांगणात शोकसभा पार पडली. या सभांना विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. डोणगाव येथील श्रद्धांजली सभेत सरपंच चरण आखाडे यांनी भावनिक शब्दांत दिवंगत नेत्यांना आदरांजली वाहिली. ''दादांनी मला विधानसभेचे तिकीट दिले, तसेच माझ्या गावासाठी महत्त्वाची पाणीपुरवठा योजना दिली, असे सांगताना त्यांच्या भावना अनावर झाल्या आणि सभास्थळी उपस्थितांचीही डोळे पाणावले.

''असा दूरदृष्टी असलेला नेता पुन्हा होणे कठीण आहे. त्यांच्या जाण्याने संपूर्ण महाराष्ट्राचे अपूरणीय नुकसान झाले असून ही पोकळी कधीही भरून निघणारी नाही,'' अशी भावना यावेळी सर्वत्र व्यक्त करण्यात आली. शेवटी उपस्थित सर्व मान्यवर व नागरिकांनी दोन मिनिटांचे मौन पाळून दिवंगत नेत्यांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण केली.






## वृत्तविशेष...

### कव्वाली गायिका अंजली भारतींचे जाहीर स्पष्टीकरण



दैनिक आपला विदर्भ

**भंडारा/प्रतिनिधी :** वादग्रस्त विधानानंतर कव्वाली गायिका अंजली भारती यांनी फेसबुकवर व्हिडिओ टाकत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. आपल्या भाषणातील तो शब्द अनावधानाने आल्याचे सांगत त्यांनी या प्रकरणावर दिलगिरी व्यक्त केली आहे. एका प्रबोधनपर कार्यक्रमात बोलताना ओघाओघात चुकीचे शब्द वापरले गेले, जे कोणाच्याही भावना दुखावण्यासाठी नव्हते, असे स्पष्टीकरण अंजली भारती यांनी दिले आहे. महिलांवरील वाढत्या अत्याचाराच्या घटना पाहता, कायद्याचा धाक निर्माण व्हावा आणि गुन्हेगारांना फाशीची शिक्षा व्हावी, हीच आपली मूळ भावना असल्याचे त्यांनी सांगितले. मी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची मुलगी असून महिलांचा अपमान करणे माझ्या संस्कारात नाही,'' असे म्हणत त्यांनी टीकाकारांना प्रत्युत्तर दिले. केवळ एका चुकीच्या वाक्यावरून आपल्याला टार्गेट केले जात असून, महिला सुरक्षेच्या मूळ मुद्द्याकडे दुर्लक्ष होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

### चिखलीत सर्वपक्षीय कडकडीत बंद





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे काल अपघाती निधन झाले या निधनाची बातमी समजताच शोकाकुल वातावरण झाले होते. काल दुपारी सर्वपक्षाच्या वतीने चिखली बंदीची हाक देण्यात आली होती, या हाकेला प्रतिसाद देत आज व्यापारी बांधवांनी चिखली बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद दिलेला आहे. शहरात शांतता व शिस्तबद्ध वातावरण दिसून आले. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे काल विमान अपघातामध्ये दुर्दैवी निधन झाले यामुळे महायुतीच्या वतीने काल चिखली बंद करण्यासाठी आमदार श्वेता महाले आणि राष्ट्रवादीचे नेते शंतनु बोंद्रे यांनी सर्वपक्षीय बंदची हाक दिली होती सकाळपासून चिखलीत सर्वपक्षीय कडकडीत बंद पाळण्यात आला व्यापाऱ्यांनी चिखली बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद दिलेला आहे, जीवनावश्यक वस्तूंची दुकाने मात्र उघडी ठेवण्यात आली आहेत.

### जवाहर नवोदय विद्यालय निवड चाचणी परीक्षा ७ फेब्रुवारीला; प्रवेशपत्र ऑनलाईन उपलब्ध

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जवाहर नवोदय विद्यालयातील इयत्ता ९ वी आणि ११ वीच्या रिक्त जागांसाठीची निवड चाचणी परीक्षा शनिवार दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे. या परिक्षेचे प्रवेशपत्र अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध झाले असून विद्यार्थ्यांनी डाऊनलोड करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

निवड चाचणी परीक्षा शनिवार दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी १.३० या वेळेत इयत्ता ९ वीसाठी जे.व्ही. मेहता हायस्कुल ता.खामगाव जि.बुलढाणा, नॅशनल हायस्कुल ता.खामगाव जि.बुलढाणा व अंजुमन हायस्कुल ता.खामगाव जि.बुलढाणा या तीन परिक्षा केंद्रावर तर ११ वीसाठी पी.एम. श्री स्कुल, जवाहर नवोदय विद्यालय, ता.शेगांव जि.बुलढाणा व म. बि. बुरुंगले हायस्कुल ता.शेगांव जि.बुलढाणा या दोन परिक्षा केंद्रावर निवड चाचणी परीक्षा होणार आहे. विद्यार्थ्यांनी सकाळी १० वाजता परीक्षा केंद्रावर हजर राहणे अनिवार्य आहे.

परीक्षेसाठीचे प्रवेशपत्र नवोदय विद्यालयाच्या www.navodaya.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. संबंधित शाळेचे मुख्याध्यापक, पालक आणि विद्यार्थ्यांनी या संकेतस्थळावरून प्रवेशपत्र डाऊनलोड करून त्याची प्रिंट सोबत ठेवावी. विद्यार्थ्यांनी आपल्या प्रवेशपत्रावर नमूद केलेल्या केंद्राची खात्री करून परीक्षेला येताना प्रवेशपत्रासोबत आवश्यक साहित्य घेऊन वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन, पी.एम. श्री स्कुल जवाहर नवोदय विद्यालयाचे प्राचार्य यांनी केले आहे.

## संसद भवन परिसरात नितीन गडकरी व राहुल गांधींची भेट, काय झाली चर्चा?

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** नितीन गडकरी हे भारतीय राजकारणातील एक वेगळे, ठाम आणि कार्यकेंद्री व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. संघटनकौशल्य, स्पष्टवक्तेपणा आणि निर्णयक्षमता ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. विचारसरणीत ठाम असले तरी कामाच्या बाबतीत ते व्यावहारिक दृष्टिकोन ठेवतात. पायाभूत सुविधांच्या विकासाला त्यांनी दिलेले प्राधान्य, विशेषत: रस्ते, महामार्ग आणि वाहतूक क्षेत्रातील बदल, यामुळे ते 'काम करणारे नेते' म्हणून ओळख निर्माण करतात. राजकीय मतभेद असले तरी संवादाचे दरवाजे बंद न ठेवणारा, सर्वपक्षीय संपर्क जपणारा नेता अशीही त्यांची प्रतिमा आहे. वैयक्तिक जीवनात साधेपणा, स्पष्ट बोलणे आणि कामातून उत्तर देण्याची शैली हे गुण त्यांच्या सार्वजनिक व्यक्तिमत्त्वाला अधिक विश्वासार्ह बनवतात. मागील वर्षातील डिसेंबर महिन्यात गडकरींनी काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांची भेट घेतली होती. आता जानेवारीमध्ये त्यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याशीही त्यांनी भेट घेतली. या भेटीबाबत चर्चा सुरू आहे.

## बौद्ध समाजातील संस्थांना पायाभूत सुविधांसाठी अनुदान; २० फेब्रुवारीपर्यंत अर्जाचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागामार्फत राज्यातील नोंदणीकृत संस्थांसाठी योजना सुरु करण्यात आली आहे. ज्या संस्थांमध्ये ५१ टक्क्यांपेक्षा जास्त बौद्ध समाजातील विश्र्वस्त किंवा सदस्य आहेत आणि ज्या संस्था शैक्षणिक, सांस्कृतिक किंवा सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत, त्यांना पायाभूत सोयी-सुविधांच्या विकासासाठी १० लक्ष रुपयांपर्यंत अनुदान उपलब्ध करून दिले जाणार आहे.

अल्पसंख्याक विकास विभागाचे दि. ७ ऑक्टोंबर २०२४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार योजनेचा लाभ घेण्यासाठी बुलढाणा जिल्ह्यातील इच्छुक संस्थांनी आपले परिपूर्ण प्रस्ताव २० फेब्रुवारी २०२६ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथील अल्पसंख्याक विभागात सादर करणे आवश्यक आहे.

योजनेच्या अटी व शर्ती : संस्था धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असावी आणि त्याबाबतचे प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे. संस्थेच्या कार्यकारी मंडळात (विश्र्वस्त/सदस्य) किमान ५१ टक्के सदस्य बौद्ध समाजातील असावेत.

यापूर्वी अशा प्रकारचे अनुदान घेतले असल्यास, त्याचा विनियोग योग्य कारणासाठी झाल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रतिस्वाक्षरी केलेले प्रमाणपत्र सादर करावे लागेल. अनुदानातून खरेदी केलेल्या साहित्याची नोंद स्वतंत्र 'जडसंग्रह नोंदवहीत' करणे आवश्यक असून, त्यावर अल्पसंख्याक विकास विभाग महाराष्ट्र शासन यांच्या अनुदानातून असे लिहिणे बंधनकारक आहे. अनुदान मिळाल्यानंतर तीन महिन्यांच्या आत जिल्हाधिकाऱ्यांकडे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. इच्छुक संस्थांनी विहित नमुन्यातील अर्ज आणि आवश्यक कागदपत्रांची यादी www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करावी. भरलेले अर्ज सर्व कागदपत्रांसह मुदतीपूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयात जमा करावेत. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी, अशी माहिती जिल्हा नियोजन अधिकारी यांनी कळविली आहे.

## मद्यधुंध वाहनचालकाची धडक अन् ३० ते ४० विद्यार्थ्यांचे जीव टांगणीला

**पुणे/प्रतिनिधी :** हल्ली वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवल्यामुळे अनेक रस्ते अपघाताच्या घटना या घडत आहे. असाच एक धक्कादायक आणि निष्काळजीपणाचा कळस असलेला प्रकार पुण्यातून उघडकीस आला आहे. या प्रकारामुळे चक्क ३० ते ४० विद्यार्थ्यांचे जीव हे टांगणीला लागले होते.सोमवारी दुपारी पावणे तीनच्या सुमारास वाघोली रोडवर ही घटना घडली. बायफ रोडवरील इंडो स्कॉट ग्लोबल शाळेच्या मद्यधुंद बस चालकाने चार दुचाकी आणि एका कार ला धडक जोरदार धडक दिली . बस चालकाने काही अंतरावर वाहन फरफटतही नेली.मिळलेल्या माहितीनुसार बत्ता बसंत रसाळ (वय ५० ) असे अटक केलेल्या बस चालकाचे नाव आहे. या भयंकर अपघातानंतर नागरिकांनी शाळेच्या बसचा पाठलाग केला आणि बस थांबवली. या प्रकारामुळे संतप्त नागरिकांनी बस चालकाला बेदम चोप देत पोलिसांच्या हवाली केले.

## नोकरदार महिलांसाठी बुलढाण्यात 'सखी निवास'वसतिगृह महिलांनी योजनेचा लाभ घ्यावा

### जिल्हा महिला व बालविकास अधिकारी अमोल डिघुळे यांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** केंद्र व राज्य शासनाच्या महिला व बालविकास विभागाच्या वतीने कृषी समृद्धी मल्टीपर्पज फाऊंडेशन बुलढाणा या स्वयंसेवी संस्थेच्यामार्फत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या नियंत्रणाखाली बुलढाण्यातील लव्ह ट्रस्ट समोर खामगाव रोड येथे नोकरी करणाऱ्या महिलांसाठी 'सखी निवास' हे वसतिगृह सुरु करण्यात आले आहे.

या वसतीगृहामध्ये शासकीय, निमशासकीय, किंवा खाजगी नोकरी करणाऱ्या महिलांसाठी सर्व सोयीसुविधांनी युक्त निवास स्थान उपलब्ध आहे. या वसतीगृहा मध्ये निवास स्थानासाठी सुसज्य व प्रशस्त इमारत, इमारती मध्ये अत्याधुनिक सीसीटिव्ही कॅमेऱ्यांची निगराणी, इमारतीसाठी सुरक्षा रक्षक, पिण्यासाठी शुद्ध व थंड पाण्याची व्यवस्था, २४ तास गरम पाणी,महिलांना फिरायला मोकळी जागा असणार आहे. याकरिता बुलढाणा जिल्ह्यातील शासकीय, निमशासकीय, किंवा खाजगी नोकरी करणाऱ्या महिलांसाठी महिला बालविकास विभागाच्या या योजनेचा जास्तीत जास्त निकषांमध्ये बसणाऱ्या महिलांनी लाभ घेवून सखी निवासच्या व्यवस्थापक मिनाक्षी झिने, कृषी समृद्धी मल्टीपर्पज फाऊंडेशन बुलढाणा यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी केले आहे.

## उगाच मोबाईल हातात घेतला, ऑनलाईन शॉपिग केली अनब बसला मोठा फटका

दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** ऑनलाईन खरेदीदरम्यान मोबाईल हॅक करून महिलेची आर्थिक फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना ऐरोली परिसरात उघडकीस आली आहे. या प्रकरणी शॉपिंग ॲपच्या माध्यमातून फसवणूक करणाऱ्या अज्ञात व्यक्तीविरोधात रबाळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ऐरोली येथे राहणारी एक महिला ऑनलाईन खरेदीसाठी एका प्रसिद्ध शॉपिंग ॲपचा वापर करत होती. त्यांनी काही वस्तू या ॲपवरून मागवल्या होत्या. खरेदीच्या प्रक्रियेदरम्यान संबंधित व्यक्तीने आर्थिक व्यवहार पूर्ण करण्यासाठी महिलेकडून मोबाईलचा ॲक्सेस मागून घेतला. विश्वास ठेऊन महिलेने मोबाईलचा ॲक्सेस दिल्यानंतर आरोपीने तिचा मोबाईल हॅक केला. यानंतर आरोपीने महिलाच्या बँक खात्यातून टप्प्याटप्प्याने २१ लाख ३८ हजार ६०० रुपये स्वत:च्या खात्यात वळवले. ही संपूर्ण घटना १९ जून ते २२ जून २०२५ या कालावधीत घडली असल्याचे तपासात समोर आले आहे. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पीडित महिलेने तात्काळ सायबर गुन्हे शाखेला ई-मेलद्वारे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीची दखल घेत बुधवारी उशिरा रात्री रबाळे पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सायबर पोलिसांकडून करण्यात येत असून नागरिकांनी ऑनलाईन व्यवहार करताना कोणालाही मोबाईल ॲक्सेस, ओटीपी किंवा वैयक्तिक माहिती देऊ नये असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## सातबारा उताऱ्यासंदर्भात भूमी अभिलेख विभागाचा मोठा निर्णय!

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील महसूल प्रशासनात मोठा बदल घडत असून आहे. सातबारा उताऱ्यातील फेरफार, न्यायालयीन प्रकरणे आणि महाराष्ट्र महसूल संहितेतील अपिलांशी संबंधित नोटिसा देण्याची प्रक्रिया आता पूर्णपणे अधिक पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधिष्ठित होणार आहे. यापुढे या सर्व नोटिसा तलाठ्यांकडून थेट पोस्ट ऑफिसच्या ऑनलाइन प्रणालीद्वारे पाठवण्यात येणार आहेत. पोस्ट ऑफिसमार्फत या नोटिसा थेट संबंधित पक्षकारांपर्यंत पोहोचवण्यात येतील, त्यामुळे नोटीस मिळाली की नाही, याबाबतचा संभ्रम दूर होणार आहे.

तलाठ्यांच्या कामाचा ताण कमी होणार- सध्या अस्तित्वात असलेल्या ऑफलाइन पद्धतीत तलाठ्यांना प्रत्यक्ष जाऊन किंवा हातोहात नोटिसा बजावाव्या लागत होत्या. या प्रक्रियेत अनेकदा नोटीस मिळाली नाही, पक्षकार सापडले नाहीत किंवा नोटीस स्वीकारण्यास नकार दिला, अशा स्वरूपाच्या तक्रारी वारंवार येत होत्या. यामुळे तलाठ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण येत होता. आता पोस्ट ऑफिसच्या माध्यमातून नोटिसा पाठवल्या जाणार असल्याने तलाठ्यांचे प्रत्यक्ष नोटीस बजावण्याचे काम कमी होणार आहे.

**तक्रारींवर उपाय म्हणून नवा निर्णय**

भूमी अभिलेख विभागाकडे ऑफलाइन नोटीस बजावणीबाबत तलाठी आणि नागरिक, दोन्ही बाजूंनी मोठ्या प्रमाणात तक्रारी येत होत्या. नोटीस मिळाली नाही, वेळेवर माहिती देण्यात आली नाही, असे वाद निर्माण होत होते. या पार्श्वभूमीवर भूमी अभिलेख विभागाने हा नवा उपाय लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. पुढील दोन महिन्यांच्या कालावधीत राज्यातील सर्व गावांमध्ये ही प्रणाली राबवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

**कोणत्या प्रकरणांमध्ये नोटिसा दिल्या जातात?**

गावपातळीवर महसूल विभागामार्फत तलाठी विविध प्रकारच्या प्रकरणांमध्ये नागरिकांना नोटिसा देतात. जमीन खरेदी-विक्री झाल्यानंतर संबंधित पक्षकारांना नोटिसा बजावल्या जातात. तसेच वारस नोंदी करताना, फेरफार अर्जांमध्ये, न्यायालयीन आदेशांच्या अंमलबजावणीसाठी आणि महसूल संहितेतील अपिलांमध्ये नोटिसा देणे आवश्यक असते. अनेक वेळा नोटीस दिल्याचा दावा केला जातो, मात्र प्रत्यक्षात पक्षकारांपर्यंत ती पोहोचत नाही, अशी परिस्थिती उद्भवत होती.

**पोस्ट ऑफिसची भूमिका काय असणार?**

या नव्या व्यवस्थेनुसार तलाठ्याकडे आलेली नोटीस ऑनलाइन पद्धतीने पोस्ट ऑफिसकडे पाठवली जाईल. पोस्ट ऑफिस त्या नोटिसा प्रिंट करून रजिस्टर पोस्टाने संबंधित पक्षकाराला पाठवेल. पोस्टमनमार्फत नोटीस पोहोचवण्यात येईल आणि त्याचा संपूर्ण रेकॉर्ड ठेवण्यात येणार आहे. नोटीस पाठवली गेल्याचे तसेच ती प्राप्त झाल्याचे नोटिफिकेशन ऑनलाइन पद्धतीने तलाठ्याला मिळणार आहे.

**ऑनलाइन ट्रॅकिंगमुळे पारदर्शकता**

नोटीस मिळाल्यानंतर त्याची पोच (अम्व्हदैतुसहू) तलाठ्याला ऑनलाइन स्वरूपात प्राप्त होईल. त्यामुळे नोटीस दिली की नाही, यावरून होणारे वाद संपुष्टात येणार आहेत. या सर्व नोटिसांचे ट्रॅक रेकॉर्ड जिल्हाधिकारी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पाहता येणार आहे. यामुळे संपूर्ण प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि विश्वासार्ह ठरणार आहे.

**प्रशासनाचा दावा काय?**

भूमी अभिलेख विभागाचे आयटी संचालक विकास गजरे यांनी सांगितले की, ''तलाठ्यांकडे आलेल्या नोटिसा पोस्ट ऑफिसकडे पाठवण्यात येतील. पोस्टाकडे आलेल्या नोटिसा प्रिंट करून त्यावर आवश्यक टपाल तिकीट लावून पोस्टमनमार्फत त्या पक्षकारांपर्यंत पोहोचवल्या जातील. याचा संपूर्ण डिजिटल रेकॉर्ड ठेवला जाईल, जो तलाठी आणि वरिष्ठ अधिकारी पाहू शकतील.''

**नागरिकांना काय फायदा?**

या नव्या प्रणालीमुळे नागरिकांना नोटीस मिळाली की नाही, याबाबत खात्री मिळणार आहे. तसेच वेळेवर माहिती मिळाल्याने न्यायालयीन व महसूल प्रक्रियांमध्ये होणारा विलंब कमी होईल. एकूणच, महसूल विभागाची नोटीस बजावणी प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि तंत्रज्ञानस्नेही होणार आहे.